**Helpdesk for Individual Shareholders holding securities in demat mode for any technical issues related to login through Depository i.e., CDSL and NSDL:**

| Login type | Helpdesk details |
|---|---|
| Individual Shareholders holding securities in Demat mode with **CDSL** | Members facing any technical issue in login can contact CDSL helpdesk by sending a request at helpdesk.evoting@cdslindia.com or contact at toll free no. 1800 22 55 33 |
| Individual Shareholders holding securities in Demat mode with **NSDL** | Members facing any technical issue in login can contact NSDL helpdesk by sending a request at evoting@nsdl.co.in or call at toll free no.: 1800 1020 990 and 1800 22 44 30 |

By Order of the Board
For V-GUARD INDUSTRIES LIMITED
Sd/-
Vikas Kumar Tak
Company Secretary


Place: Kochi
Date : July 31, 2023

**V-GUARD INDUSTRIES LIMITED,** Regd. Office: 42/962, Vennala High School Road, Vennala P.O, Ernakulam – 682 028, Kerala, India. I Ph: 0484-4335000. E-mail: mail@vguard.in I Website: www.vguard.in I CIN: L31200KL1996PLC010010

This PDF was uploade To Telegram channel_ LBS Newspaper platform (https://t.me/LBSNEWSPAPER): @LBSNEWSPAPER

# दादा कोंडकेंच्या लोकप्रिय चित्रपटांच्या प्रिंट 'एव्हरेस्ट'कडे सोपवणार

## मुंबई हायकोर्टाचा मोठा निर्णय



**मुंबई, दि. ३० ( प्रतिनिधी )** : मराठी चित्रपटसृष्टीतील सुप्रसिद्ध दिवंगत अभिनेते व निर्माते दादा कोंडके यांच्या १२ लोकप्रिय चित्रपटांच्या प्रिंट पॉझिटिव्ह/ निगेटिव्हज या एव्हरेस्ट एंटरटेन्मेंट कंपनीकडे सोपवण्याचे निर्देश मुंबई उच्च न्यायालयाने फिल्म एंटरप्राईजेस प्रायव्हेट लिमिटेड आणि नॅशनल फिल्म डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमिटेड या दोन फिल्म लॅबोरेटरीजना नुकतेच दिले. उच्च न्यायालयाच्या या आदेशामुळे दादांच्या या चित्रपटांवर हक्क सांगणाऱ्या शाहीर दादा कोंडके प्रतिष्ठानचे विश्वस्त हृदयनाथ कडू देशमुख व उषा चव्हाण यांना धक्का बसला आहे. त्यांनी याप्रश्नी पुण्यातील न्यायालयात दोन्ही लॅबविरोधात दावा दाखल केला आहे. त्यामुळे 'एव्हरेस्ट'ने उच्च न्यायालयात दावा दाखल करतानाच एक अर्ज केला होता. 'त्या १२ चित्रपटांवर आमचाच स्वामित्व हक्क असल्याचे जाहीर करावे आणि त्यांच्या प्रिंट प्रतिष्ठानच्या विश्वस्तांकडे देण्यास मज्जाव करावा', अशी विनंती कंपनीने अर्जात केली होती. त्या अर्जावरील सुनावणीअंती न्या. रियाझ छागला यांनी वरील अंतरिम आदेश दिला आणि विश्वस्तांच्या म्हणण्याबाबत २३ ऑगस्टला सुनावणी ठेवली.

'दादा कोंडके यांचे १४ मार्च १९९८ रोजी निधन झाले. त्यापूर्वीच २ जानेवारी १९९८ रोजी त्यांनी आपले मृत्यूपत्र तयार करून आपली बहीण लीलाबाई मोरे यांच्या स्नुशा माणिक मोरे यांच्याकडे चित्रपटांचे हक्क सोपवले होते. यामध्ये सोंगाड्या, आंधळा मारतो डोळा, पांडु हवालदार, बोट लावीन तिथे गुदगुल्या, आली अंगावर, सासरचे धोतर, मुका घ्या मुका आणि अंधेरी रात में दिया तेरे हाथ में (हिंदी) या चित्रपटांचा समावेश होता.

दादांच्या मृत्यूपत्राबाबत पुणे न्यायालयाने तपासणीअंती २००८मध्ये प्रमाणपत्रही दिले होते. त्यामुळे संपूर्ण हक्क हे माणिक मोरे यांच्याकडे होते. त्यांनी १० ऑगस्ट २०२२ रोजी ते आमच्याकडे दिले होते.

परिणामी प्रतिष्ठानच्या विश्वस्तांच्या दाव्यात अर्थ नाही', असे म्हणणे 'एव्हरेस्ट'ने ज्येष्ठ वकील आशीष कामत यांनी मांडले. तर 'उच्च न्यायालयाने एव्हरेस्ट कंपनीला दिलासा दिल्यास पुणे न्यायालयातील दाव्यातील सुनावणीत अडथळा निर्माण होईल', असे म्हणणे विश्वस्तांच्या वकिलांनी मांडले.

मात्र, दादांच्या मृत्यूपत्राप्रमाणे मूळ स्वामित्व हक्क हे माणिक यांच्याकडे होते, हे प्रथमदर्शनी स्पष्ट होत असल्याने तूर्त प्रिंट 'एव्हरेस्ट'कडे द्यावेत, असे न्या. छागला यांनी अंतरिम आदेशात स्पष्ट केले.

# महात्मा फुले जनआरोग्य योजनेचा लाभ आता सर्वांना मिळणार!

## खर्चाची मर्यादाही वाढवली

**मुंबई, दि. ३० ( प्रतिनिधी )** : राज्य सरकारची महात्मा जोतिराव फुले जनआरोग्य योजना ही आता अधिक व्यापक करण्यात आली असून राज्यातील सर्व शिधापत्रिकाधारक व अधिवास प्रमाणपत्रधारक नागरिकांना लागू करण्यात आली आहे. राज्यातील एकूण अंगीकृत रुग्णालयांची संख्या १,३५० झाली असून सर्व लाभार्थी नागरिकांचे आरोग्य कवचही दीड लाख रुपयांऐवजी आयुष्मान भारत-प्रधानमंत्री जनआरोग्य योजनेप्रमाणे पाच लाख रुपयांपर्यंत वाढवण्यात आले आहे. मागील महिन्यात २८ जून रोजी राज्य मंत्रिमंडळ बैठकीत झालेल्या निर्णयाच्या अनुषंगाने सार्वजनिक आरोग्य विभागाने शुक्रवार, २८ जुलै रोजी सुधारित योजनेचा शासन निर्णय तपशीलवार जाहीर केला. केंद्र सरकारच्या योजनेसोबत सुधारित स्वरूपात राज्याची जनआरोग्य योजना राबवण्यात येणार असल्याने अधिकाधिक लोकांना त्याचा लाभ मिळणार आहे.

राज्यात यापूर्वी केशरी शिधापत्रिका व अंत्योदय शिधापत्रिका असणाऱ्या नागरिकांनाच फुले जनआरोग्य योजनेचा लाभ मिळत होता. आता राज्यातील सर्व शिधापत्रिकाधारक, अधिवास प्रमाणपत्र प्राप्त नागरिकांना आरोग्य संरक्षणाचे कवच. प्रधानमंत्री जनआरोग्य योजनेप्रमाणेच प्रतिकुटुंब प्रतिवर्ष पाच लाख रुपयांचे आरोग्य कवच. या एकत्रित अंमलबजावणीमुळे दोन्ही योजनांतील समाविष्ट उपचारांचा लाभ मिळणार आहे.

सध्या फुले योजनेत ९९६ तर, प्रधानमंत्री योजनेत एक हजार २०९ उपचार. त्यात वाढ केल्याने आता दोन्ही योजनांत प्रत्येकी एक हजार ३५६ उपचारांचा समावेश आहे.

फुले योजना याआधीच महाराष्ट्र-कर्नाटक सीमाभागात लागू करून सीमेलगतच्या महाराष्ट्र राज्यातील आठ जिल्ह्यांत १४० आणि कर्नाटक राज्यातील दहा अतिरिक्त रुग्णालये अंगीकृत करण्याचा निर्णय झाला आहे. याव्यतिरिक्त दोनशे रूग्णालये अंगीकृत करण्यास मान्यता देण्यात आल्याने अंगीकृत रुग्णालयांची संख्या एक हजार ३५० आहे.

आता सर्व शासकीय रुग्णालये अंगीकृत करण्यात आली असून यापुढे मागास भागात नव्याने सुरू होणारी सर्व रुग्णालयेही त्यांची इच्छा असल्यास एकत्रित योजनेत अंगीकृत केली जाणार आहेत.

मूत्रपिंड शस्त्रक्रियेसाठी फुले जनआरोग्य योजनेतील उपचार खर्च मर्यादा अडीच लाख रुपयांवरून वाढवून साडेचार लाख रुपये करण्यात आला आहे.

स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे रस्ते अपघात विमा योजनेचा फुले जनआरोग्य योजनेत समावेश; तसेच रस्ते अपघाताबाबतच्या उपचारांची संख्या ७४ वरून १८४ करण्यात आली. उपचाराच्या खर्च मर्यादेतही प्रतिरुग्ण ३० हजार रुपयांवरून एक लाख रुपये, अशी वाढ केली असून यात राज्याच्या भौगोलिक क्षेत्रातील रस्ते अपघातांत जखमी झालेल्या, राज्यातील व देशातील रुग्णांचा समावेश होणार आहे.

**परिशिष्ट के. 18**
**(उपविधी के. 34 अन्वये)**

मयत सभासदाचे संस्थेच्या मांडवलात मालमत्तेत असलेले हितसंबंध व भाग हस्तांतरीत करण्याबाबत डक्क मागण्या किंवा हरकती मागविण्यासाठी दयावयाच्या नोटिशीचा नमुना (मोठया प्रमाणामध्ये प्रसारित होणा-या स्थानिक वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्दी देण्यांत यावी)

**नोटीस**

शांता आशिष "सी" सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, पत्ता दादाभाई रोड, विले पार्ले (प.). मुंबई 400056. या संस्थेचे सभासद असलेल्या या संस्थेच्या इमारतीत / भूखंडावर सदनिका क्रमांक सी-06, तळमजला, क्षेत्रफळ 300 चौ. फूट कारपेट धारण करणा-या श्री. किसन राघो गोठनकर यांचे दिनांक 30.03.1998 रोजी निधन झाले. त्यांनी नामनिर्देशन केलेले नाही संस्था या नोटीशीद्वारे संस्थेच्या भांडवलात / मालमत्तेत असलेले मयत सभासदाचे भाग व हितसंबंध हस्तांतरीत करण्यासंबंधी मयत सभासदाचे वारसदार किंवा अन्य मागणीदार / हरकतदार यांच्याकडून हक्क मागण्या / हरकती मागविण्यांत येत आहेत. हि नोटीस प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून 7 दिवसात त्यांनी आपल्या मागण्यांच्या वा हरकतींच्या पृष्टर्थ आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रती व अन्य पुरावे सादर करावेत. जर वर नमुद केलेल्या मुदतीत कोणाही व्यक्तीकडून हक्क मागण्या किंवा हरकत सादर झाल्या नाही तर मयत सभासदाचे संस्थेच्या भांडवलातील / मालमत्तेतील भाग व हितसंबंध यांच्या हस्तांतरणाबाबत संस्थेच्या उपविधी नुसार कार्यवाही करण्याची संस्थेला मोकळीक राहील. जर अशा कोणत्याही हक्क मागण्या / हरकत आल्या तर त्याबाबत संस्थेच्या उपविधीनुसार कार्यवाही करण्यांत येईल. नोदी व उपविधीची एक प्रत मागणीदारास / हरकतदारास पाहण्यासाठी संस्थेच्या कार्यालयात ॲड. पूजा जगताप यांचेकडे सकाळी / दुपारी 11.00 ते संध्याकाळी 8.00 पर्यंत नोटीस दिल्याच्या दिनांकापासून नोटीशीची मुदत संपण्याच्या दिनांकापर्यंत उपलब्ध राहील.

**ॲड. पूजा जगताप.**
202/4, शांता निवास, केएनएस बँकच्या मागे, "एल" वार्ड ऑफीसच्या मागे,
सीएसटी रोड, कुर्ला (प.) मुंबई 400070
मो. कं. 8104790643.

**परिशिष्ट के. 18**
**(उपविधी के. 34 अन्वये)**

मयत सभासदाचे संस्थेच्या भांडवलात मालमत्तेत असलेले हितसंबंध व भाग हस्तांतरीत करण्याबाबत हक्क मागण्या किंवा हरकती मागविण्यासाठी दयावयाच्या नोटिशीचा नमुना (मोठया प्रमाणामध्ये प्रसारित होणा-या स्थानिक वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्दी देण्यांत यावी)

**नोटीस**

शांता आशिष "सी" सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित पत्ता दादाभाई रोड, विले पार्ले (प.).. मुंबई - 400056. या संस्थेचे सभासद असलेल्या वा संस्थेच्या इमारतीत / भूखंडावर सदनिका क्रमांक सी-22, क्षेत्रफळ 275 चौ. फूट कारपेट धारण करणा-या श्री. महादेव सयाजी लवांडे यांचे दिनांक 25.02.2017 रोजी निधन झाले. त्यांनी नामनिर्देशन केलेले नाही. संस्था या नोटीशीद्वारे संस्थेच्या भांडवलात / मालमत्तेत असलेले मयत सभासदाचे भाग व हितसंबंध हस्तांतरीत करण्यासंबंधी मयत सभासदाचे वारसदार किंवा अन्य मागणीदार / हरकतदार यांच्याकडून हक्क मागण्या / हरकती मागविण्यात येत आहेत. हि नोटीस प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून 7 दिवसात त्यांनी आपल्या मागण्यांच्या वा हरकतींच्या पृष्टर्थ आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रती व अन्य पुरावे सादर करावेत जर वर नमुद केलेल्या मुदतीत कोणाही व्यक्तीकडून हक्क मागण्या किंवा हरकत सादर झाल्या नाही तर मयत सभासदाचे संस्थेच्या भांडवलातील / मालमत्तेतील माग व हितसंबंध यांच्या हस्तांतरणाबाबत संस्थेच्या उपविधी नुसार कार्यवाही करण्याची संस्थेला मोकळीक राहील. जर अशा कोणत्याही हक्क मागण्या / हरकत आल्या तर त्याबाबत संस्थेच्या उपविधीनुसार कार्यवाही करण्यात येईल नोंदी व उपविधीची एक प्रत मागणीदारास / हरकतदारास पाहण्यासाठी संस्थेच्या कार्यालयात ॲड. पूजा जगताप यांचेकडे सकाळी / दुपारी 11.00 ते संध्याकाळी 6.00 पर्यंत नोटीस दिल्याच्या दिनांकापासून नोटीशीची मुदत संपण्याच्या दिनांकापर्यंत उपलब्ध राहील.

**ॲड. पूजा जगताप.**
202/4, शांता निवास, केएनएस बँकच्या मागे, "एल" वार्ड ऑफीसच्या मागे,
सीएसटी रोड, कुर्ला (प.) मुंबई 400070
मो. कं. 8104790643.

# बोरीवलीतील श्रीकृष्ण नगरमधील पुलाचे बांधकाम वन विभागाच्या परवानगी अभावी रखडले

**मुंबई, दि. ३० ( प्रतिनिधी )** : बोरीवली पूर्व येथील नॅशनल पार्क जवळील श्रीकृष्ण नगरमधील दहिसर नदीवरील वाहतूक पूल हे धोकादायक बनले असून या पुलाची तातडीने बांधणी केली जात असली तरी वन विभागाच्या परवानगी अभावी या पुलाचे दुसऱ्या टप्प्यातील बांधकाम काही अंशी रखडले गेले आहे. या पुलाच्या पुनर्बांधणीकरता विविध करांसह सुमारे १३ कोटी रुपयांचा खर्च केला जाणार आहे. बोरीवली रेल्वे स्थानकापासून नॅशनल पार्क व मेट्रो रेल्वे स्थानकाला जोडणाऱ्या आकाशमार्गिका अर्थात स्कायवॉकचे बांधकाम हाती घेतले आहे. या स्कायवॉकचे बांधकाम करणाऱ्या कंत्राटदारकडूनच या श्रीकृष्ण नगरमधील नदीवरील पुलाचे बांधकाम केले जात असून केवळ वन विभागाच्या परवानगी अभावी हत्ती गेला आणि शेपूट राहिले अशी परिस्थिती या पुलाची झाली आहे.

बोरीवली पूर्व येथील श्रीकृष्ण नगर पुलाचा भाग काही भाग काही दिवसांपूर्वी कोसळला. त्यामुळे या पुलाचा भाग कोसळल्यानंतर महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी या पुलाची पाहणी केली. त्यात हे पूल धोकादायक झाल्याने ते वाहतुकीसाठी बंद करण्यात आले होते. हे पूल अभिनव नगर, श्रीकृष्ण नगर आणि पश्चिम द्रुतगती महामार्ग यांना जोडणारा एकमेव पूल असल्याने महापालिकेने तातडीने या पुलाची बांधणी करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींकडून झाल्याने या पुलाचे बांधकाम स्कायवॉकसाठी नियुक्त केलेल्या कंत्राटदाराकडून करून घेण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार पूर्वीच्या एक मार्गिका असलेल्या या पुलाचे रुंदीकरण करून दोन वाहने धावू शकतील अशा दोन मार्गिका असलेल्या पुलाचे बांधकाम संबंधित कंत्राटदाराकडून करून घेण्यात आले. त्यानुसार एक मार्गिकेचे काम मागील दोन महिन्यांपूर्वी पूर्ण झाले असून उर्वरीत एका मार्गिकेचेही बहुतांशी काम पूर्ण झाले असून उर्वरीत काम वन विभागाच्या ना हरकत प्रमाणपत्राअभावी रखडल्याची माहिती मिळत आहे. त्यामुळे या पुलाचे काम एव्हाना पूर्ण होण्याची शक्यता असतानाही नॅशनल पार्कच्या परिसराचा ५० चौरस मीटरच्या जागेतून यापुलाचा भाग जात असल्याने यासाठी वन विभागाची परवानगी आवश्यक आहे. परंतु ही परवानगी न मिळाल्याने श्रीकृष्ण नगरमधील पुलाचे काम रखडल्याचे बोलले जात आहे.

महापालिकेच्या पूल विभागाच्या अधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, या पुलाचा भाग धोकादायक बनल्याने स्थानिक लोकप्रतिनिधींच्या मागणीनुसार तातडीने या पुलाचे बांधकाम येथील स्कायवॉकसाठी नियुक्त केलेल्या कंत्राटदाराकडून करून घेण्याचा निर्णय घेतला आहे.

त्यानुसार या पुलाचे बांधकाम हाती घेत पहिल्या टप्प्यातील काम पूर्ण केले. पहिल्या टप्प्यातील काम पूर्ण झाल्यानंतर एक मार्गिका दोन महिन्यांपूर्वी सुरु करण्यात आली.

त्यानंतर दुसऱ्या टप्प्यातील काम सुरुवात झाली आहे. त्यातील वन विभागाच्या अखत्यारित ५० चौरस मीटरची जागा येत असून या जागेत पुलाची उभारणी करण्यासाठी वन विभागाची परवानगी आवश्यक आहे. या परवानगीसाठी अर्ज करण्यात आला असून नागपूर येथील वन विभागाच्या कार्यालयाच्यावतीने परवानगी मिळण्याची प्रतीक्षा आहे. त्यामुळे वन विभागाची परवानगी मिळताच दुसऱ्या टप्प्यातील कामाला गती येईल असे पूल विभागाच्या अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

पूल विभागाचे प्रमुख अभियंता संजय कौडण्यपुरे यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी श्रीकृष्ण नगरमधील पुलाचे दुसऱ्या टप्प्यातील काम जवळपास पूर्ण होत आहे. काही भाग जो वन विभागाच्या अखत्यारित येत असल्याने यासाठीच्या वन विभागाच्या परवानगीची प्रतीक्षा आहे. वन विभागाची परवानगी मिळताच उर्वरीत पुलाचे काम पूर्ण केले जाईल,असे त्यांनी स्पष्ट केले. मुंबई महापालिकेच्यावतीने बोरीवली पूर्व रेल्वे स्थानक ते ओंकारेश्वर मंदिर नॅशनल पार्क पर्यंत स्कायवॉक उभारण्याचा निर्णय घेत कंत्राटदाराची निवड केली होती. या स्कायवॉकसाठी ९१ कोटी रुपये खर्च करण्यास स्थायी समितीने मंजुरी दिली होती. परंतु या स्कायवॉकचे काम दुकानदारांच्या विरोधामुळे रखडले होते, परंतु या स्कायवॉकचे काम मागील काही महिन्यांपूर्वी सुरु झाले आहे. हे स्कायवॉक बनवणाऱ्या कंत्राटदाराकडून तातडीने श्रीकृष्ण नगर पुलाची बांधणी केली जात आहे. त्यामुळे रेल्वे स्टेशन ते नॅशनल पार्क अशाप्रकारे उभारण्यात येणारे स्कायवॉक मेट्रो रेल्वे स्थानकाला जोडले जाणार असल्याने लोकल रेल्वे आणि मेट्रो कनेक्टिविटी होणार आहे.

# फाईन ऑर्गेनिक्स इंडस्ट्रिज लिमिटेड

FINE ORGANICS

**नोंदणीकृत कार्यालय :** फाईन हाऊस, आनंदजी स्ट्रीट, ऑफ एम. जी. रोड, घाटकोपर (पूर्व), मुंबई ४०० ०७७,
**दूर. :** +९१ (०२२) २१०२५०००, **फॅक्स :** +९१ (०२२) २१०२८८९९ **ई मेल:** investors@fineorganics.com
**वेबसाइट :** www.fineorganics.com **सीआयएन :** L24119MH2002PLC136003

## फाईन ऑर्गेनिक्स इंडस्ट्रिज लिमिटेडची २१ वी वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना

**सूचना** याद्वारे देण्यात येते की, फाईन ऑर्गेनिक्स इंडस्ट्रिज लिमिटेड (कंपनी) यांच्या सभासदांची एकवीसवी वार्षिक सर्वसधारण सभा (एजीएम) गुरुवार, दि. २४ ऑगस्ट, २०२३ रोजी स. ११.०० वा. (भा.प्र.वे.) एजीएमच्या सूचनेमध्ये व्यवसायांवर विचार विनीमय करण्याकरिता व्हिडीओ कॉन्फरेंसिंग (व्हीसी)/ अन्य ऑडिओ व्हिज्युअल मीन्स (ओएव्हीएम) मार्फत आयोजित केली आहे. सीक्युरिटीज ॲन्ड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया (सेबी) (एकत्रितरित्या लागू सर्क्युलर्स) यांच्याद्वारे जारी सर्क्युलर क्र. २०/२०२०, ०२/२०२१, ०२/२०२२, १०/२०२२ दि. ५ मे, २०२० व दि. १३ जानेवारी, २०२१, दि. ०५ मे, २०२२ व २८ डिसेंबर, २०२२ रोजी व कॉर्पोरेट अफेअर्स (एमसीए) मंत्रालय व सेबी सर्क्युलर दि. १२ मे, २०२०, १५ जानेवारी, २०२१, १३ मे, २०२२ व ५ जानेवारी, २०२३ रोजी सीक्युरिटीज ॲन्ड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया (सेबी) (एकत्रितरित्या लागू सर्क्युलर्स) एजीएम आयोजित केली आहे. सभासदांनी कंपनी कायदा, २०१३ च्या अनुच्छेद १०३ अंतर्गत कोरमच्या रिनॉकिंगच्या हेतुकरिता व्हीसी/ ओएव्हीएम मार्फत सभेमध्ये उपस्थित राहावे.

लागू सर्क्युलर्स अनुसार वार्षिक अहवाल, एजीएम आयोजित सूचना व ई-मतदान माहिती सभासदांना ज्यांचे ईमेल आयडी संबंधित डिपॉझिटरी पार्टीसिपंट्स व/वा कंपनीचे रजिस्ट्रर व शेअर ट्रान्सफर एजन्ट (आरटीए) अर्थात केफिन टेक्नोलॉजीज प्रायव्हेट लिमिटेड (केफिन) यांच्यासह नोंदणीकृत ईमेल आयडीवर ईलेक्ट्रॉनिक स्वरूपात पाठवावे. सभासद ज्यांनी अजून त्यांचे ईमेल आयडी नोंदणीकृत केलेले नाहीत व जे प्रत्यक्ष स्वरूपात शेअर्स धारक आहेत त्यांनी त्यांचे ईमेल आयडी व मोबाईल क्रमांक कंपनीच्या आरटीएसह einward.ris@kfintech.com वरील लिंकवर क्लिक करून अद्ययावत करावे व वरील निर्देशित लिंकमधील प्रक्रिया पाहावी. स्वाक्षरी केलेले स्कॅन्ड प्रत व विनंती पत्र ज्यामध्ये ईमेल आयडी, मोबाईल क्रमांक, सेल्फ अटेस्टेड पॅन कॉपी व क्लाएंट मास्टर कॉपी ईलेक्ट्रॉनिक फोलिओज यांच्यासह ईमेल विनंती पाठवावी. वार्षिक अहवाल व एजीएमची सूचना तसेच ई-मतदान माहिती आरटीए वेबसाइट https://evoting.kfintech.com तसेच कंपनीची वेबसाइट www.fineorganics.com वर उपलब्ध आहे. सदर स्टॉक एक्सचेंज अर्थात नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेड www.nseindia.com व बीएसई लिमिटेड www.bseindia.com ची वेबसाइट वर उपलब्ध आहे.

सभासदांनी कृपया एजीएमची सूचना पाहावी व व्हीसी/ ओएव्हीएम मार्फत एजीएमच्या ठिकाणी उपस्थित राहावे.

**बुक क्लोजर व लाभांशाचे प्रदान**

वित्तीय वर्ष २०२२-२३ करिता अंतिम लाभांशांकरिता सक्षम असलेल्या सभासदांना सभासदांचे रजिस्ट्रर व कंपनीचे शेअर ट्रान्सफर बुक्स गुरुवार, दि. १७ ऑगस्ट, २०२३ ते गुरुवार, दि. २४ ऑगस्ट, २०२३ रोजी (दोन्ही दिवस समाविष्ट) दरम्यान बंद राहिल. अंतिम लाभांश जर एजीएममध्ये घोषित केल्यास अशा सभासदांना प्रदान करावे ज्यांचे नाव सभासदांचे रजिस्ट्रर व/वा लाभार्थी मालक यांचे रजिस्ट्रमध्ये उपलब्ध डिपॉझिटरीजद्वारे व्यवसाय वेळेच्या अंतिम तारखेस बुधवार, दि. १६ ऑगस्ट, २०२३ रोजी पर्यंत प्रदान करावे.

अंतिम लाभांश रु. ९/- प्रति समभाग शेअर जे एकवेळ विश्शेष लाभांश प्रति इक्विटी शेअर भांडवल सदर दि. ३१ मार्च, २०२३ रोजी अखेर वित्तीय वर्षाकरिता एजीएमच्या निष्कर्शांपासून ६ दिवसांपासून समक्ष सभासदांना प्रदानित करण्याची मंजूरी दिली आहे. लाभांशाचे प्रदान सभासदांना ईलेक्ट्रॉनिकली करण्यात येईल ज्यांनी त्यांचे बँक तपशील अद्ययावत केले आहेत. जर सभासदांचे बँक खाते तपशील नॉन-अपडेशन वा उपलब्ध नसतील. लाभांश रक्कमेचे थेट रोख स्विकृत झाल्यास सभासदांनी कृपया त्यांचे कोअर बँकिंग सल्युशन्स सक्षम खाते क्रमांक व त्यांचे बँक मॅनडेट/ एनईसीएस/ डायरेक्ट क्रेडिट तपशील/ नाव/ पत्ता/ मुखत्यारपत्र अद्ययावत करावे.

१. प्रत्यक्ष स्वरूपातील शेअर्स धारक यांनी सभासद यांना कृपया स्वाक्षरी केलेले कव्हरिंग पत्र पहिले धारक यांच्याद्वारे रद्द चेक लीफ यांच्यासह नाव व बँक खाते तपशील, सेल्फ अटेस्टेड पॅन कार्ड प्रत व कंपनीचे आरटीए अर्थात केफिन व

२. शेअर्स जे डिमटेरियलाईज्ड स्वरूपातील शेअर्स जे डिपॉझिटरी पार्टीसिपंट्स यांच्यासह त्यांच्या डिमॅट खात्यामध्ये करावे.

सेबी अंतर्गत सर्क्युलर क्र. सेबी/ एचओ/एमआयआरएसडी/ एमआयआरएसडी-पीओडी-१/पी/सीआयआर/ २०२३/३७ दि. १६ मार्च, २०२३ रोजी अनिवार्यता भागधारक यांच्याकरिता प्रत्यक्ष स्वरूपातील शेअर्स धारक असल्यास फर्निश पॅन, केवायसी (अर्थात टपाली मतदान पत्ता पिन कोड, ईमेल आयडी, मोबाईल क्रमांक, बँक खाते तपशील, विशेष स्वाक्षरी, डिमॅट खाते तपशील) व केफिन तपशील व त्यांचे वारस. पुढे तपशील व संबंधित प्रपत्र वरील निर्देशित कंपनीची वेबसाइट https://www.fineroganics.com/investor-kyc-updation/ वर उपलब्ध आहे.

**ई-मतदान**

कंपनीने त्यांच्या सभासदांना ई-मतदानाच्या मार्फत व्यवहार करण्याकरिता एजीएमच्या सूचनेमध्ये पार पडलेल्या व्यवसायांवर ईलेक्ट्रॉनिक मीन्स मार्फत (परोक्ष ई-मतदान) मतदान मार्फत एजीएमच्या ठिकाणी विचारविनीमय करण्याकरिता ठराव प्रक्रियांवर मतदान करण्याचा अधिकार आहे. कंपनीने व्हीसी/ ओएवहीएम मार्फत एजीएममध्ये सभासदांना सहभागी होण्याकरिता ई-मतदानाची सुविधा व सभासदांना परोक्ष ई-मतदानाची सुविधा प्रदान करण्याकरिता केफिन कंपनी नियुक्त केली आहे.

परोक्ष ई-मतदान लागू होण्याची प्रक्रिया व स्वरूप १. डिमॅट स्वरूपातील प्रतिभूती धारक वैयक्तिक भागधारक, २. सभासद जे प्रत्यक्ष स्वरूपातील शेअर्स धारक आहेत व नॉन-वैयक्तिक सभासद (प्रत्यक्ष स्वरूपातील वा डिमॅट स्वरूपातील शेअर्स धारक), ३. व्हीसी/ ओएव्हीएम मार्फत उपस्थित सभेच्या ठिकाणी सभासदांकरिता माहिती, एजीएमच्या ठिकाणी ई-मतदान टीप क्र. १७ व १८ मध्ये प्रदानित एजीएमची सूचना.

वैयक्तिक भागधारक यांच्याकरिता हेल्पडेस्क जे डिमॅट स्वरूपातील प्रतिभूती धारक कोणत्याही तांत्रिकी अडचणींकरिता डिपॉझिटरी अर्थात एनएसडीएल वा सीडीएसएल मार्फत लॉगीन करावे :

| एनएसडीएल | सीडीएसएल |
|---|---|
| एनएसडीएल हेल्पडेस्क ईमेल evoting@nsdl.co.in वा टोल फ्री क्रमांक १८०० १०२० ९९० वा १८०० २२ ४४ ३० वर संपर्क साधावा. | सीडीएसएल हेल्पडेस्क ईमेल helpdesk.evoting@cdslindia.com वा संपर्क क्र. ०२२-२३०५८७३८ वा ०२२-२३०५८५४२-४३ |

परोक्ष ई-मतदान सुविधेची सुरुवात **शनिवार, दि. १९ ऑगस्ट, २०२३ रोजी स. ९.०० पासून (भाप्रवे) व बुधवार, दि. २३ ऑगस्ट, २०२३ रोजी सायं. ५.०० वा. (भाप्रवे)** बंद होत आहे. परोक्ष ई-मतदान मोड्युल मतदानाकरिता त्यानंतर अकार्यतर करण्यात येईल.

केवळ सभासद ज्यांचे नाव सभासदांच्या रजिस्ट्रर/ लाभार्थी मालक यांमध्ये उपलब्ध आहे अशांना **निर्धारित तारीख अर्थात बुधवार, दि. १६ ऑगस्ट, २०२३ रोजी** एजीएमच्या दरम्यान परोक्ष ई-मतदानाची सुविधा उपलब्ध करण्याचा अधिकार आहे. कोणाही व्यक्तीस कंपनीचे सभासद आहेत त्यांना एजीएमच्या सूचनेच्या पाठवणी पश्चात व खालील निर्देशित प्रक्रियांद्वारे युजर आयडी व पासवर्ड प्राप्त करण्याकरिता निर्धारित तारीख अनुसार शेअर्स धारक.

१. जर सभासदांचा मोबाईल क्रमांक फोलिओ क्र./ डीपी आयडी क्लाएंट आयडीसह नोंदणीकृत आहे अशा सभासदांनी एसएमएस : एमवायईपीडब्ल्यूडी (Space) ई-मतदान इव्हेंट क्रमांक +फोलिओ क्रमांक वा डीपी आयडी क्लाएंट आयडी ९२१२९९३३९९ वर पाठवावा.
   १. एनएसडीएलकरिता उदाहरण :
   MYEPWD <SPACE> in12345612345678
   २. सीडीएसएलकरिता उदाहरण :
   MYEPWD <SPACE> 1402345612345678
   ३. प्रत्यक्षकरिता उदाहरण :
   MYEPWD <SPACE> XXXX1234567890
   (XXXX ई-मतदान इव्हेंट क्रमांक म्हणून)
   २. जर ईमेल आयडी वा मोबाईल क्रमांक सभासदांना फोलिओ क्र./ डीपी आयडी क्लाएंट आयडी संबंधात नोंदणीकृत असेल तर होम पेज https://evoting.kfinetech.com/ वर पाहावे, सभासदांनी पासवर्ड जनरेट करण्याकरिता फोरगॉट पासवर्ड वर क्लिक करावे व फोलिओ क्र. वा डीपी आयडी क्लाएंट आयडी एन्टर करावे.

३. जर कोणत्याही चौंकशीकरिता हेल्प ॲन्ड एफएक्यूज सेक्शन https://evoting.kfintech.com वा केफिन टोल फ्री क्रमांक १-८००-३०९-४००१ वर संपर्क साधावा.

४. सभासदांनी ईमेल विनंती einward.ris@kfintech.com वर पाठवावी. त्यामुळे केफिन यांनी विद्यमान युजर आयडी व पासवर्ड नवीन सभासदांना ज्यांचे ईमेल आयडी उपलब्ध आहेत त्यांना पाठवावे.

युजर आयडी व पासवर्ड प्राप्त करण्याकरिता विहित प्रक्रिया एजीएमच्या सूचनेमध्ये प्रदानित सुद्धा आहे जी वरील निर्देशित कंपनीची वेबसाइट वर व केफिनची वेबसाइट वर सुद्धा उपलब्ध आहे.

सभासद व्हीसी मार्फत एजीएमच्या ठिकाणी उपस्थित राहावे व परोक्ष ई-मतदानाच्या मार्फत त्यांचे मतदान पार पडले नसेल त्यांनी एजीएमच्या ठिकाणी मतदान करण्याकरिता सक्षम असावे. सभासदांनी त्यांचे मतदान परोक्ष ई-मतदानामार्फत पार पाडावे व त्यांचे मतदान सक्षम करण्याकरिता एजीएमच्या ठिकाणी उपस्थित राहावे.

ई-मतदानामध्ये सहभागी होण्याच्या संबंधात कोणत्याही चौंकशीकरिता कृपया एफएक्यूज व युजर मॅन्युअल्स व सभासदांनी डाऊनलोड सेक्शन वेबसाइट (बॉटम कॉर्नर) यांना केफिनटेक वरील https://evoting.kfintech.com/ वा केफिन टोल फ्री क्रमांक १-१८००-३०९४-००१ वर संपर्क साधावा.

**फाईन ऑर्गेनिक्स इंडस्ट्रिज लिमिटेड करिता**
**पुजा लोहोर**
**कंपनी सचिव व अनुपालन अधिकारी**

**ठिकाण : मुंबई**
**दि. ३१ जुलै, २०२३**

# पुढील आठवड्यात पाणीकपात मागे घेण्याची शक्यता

## तुळशी, विहार, तानसापाठोपाठ मोडकसागर तलावही भरले

**मुंबई, दि. ३० ( प्रतिनिधी )** : मुंबईला पाणी पुरवठा करणाऱ्या तुळशी, विहार आणि तानसा या तलावांपाठोपाठ मोडकसागर तलावही गुरुवारी रात्री ओसंडून वाहू लागल्यानंतर आता पाणी साठ्यातही वाढ होत आहे. मुंबईला पाणी पुरवठा करणाऱ्या धरणांमध्ये ७१.८४ टक्के एवढा पाणी साठा जमा आहे. त्यामुळे पुढील आठवड्यात पाणी पातळी आणि साठा यांचा आढावा घेऊन सध्या लागू असलेल्या दहा टक्के पाणीकपात मागे घेण्याचा निर्णय घेण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

मुंबईला पाणी पुरवठा करणाऱ्या अप्पर वैतरणा, मोडकसागर, तानसा, मध्य वैतरणा, भातसा, विहार, आणि तुळशी या सात तलावांमधून दरदिवशी ३७५० दशलक्ष लिटर्स एवढा पाण्याचा पुरवठा होतो. मुंबईकरांची वर्षभराची तहान भागवण्यासाठी या सर्व धरण तथा तलावांमध्ये १४ लाख ४७ हजार ३६३ दशलक्ष लिटर्स एवढ्या पाण्याची आवश्यकता असते. मात्र, २९ जुलै २०२३ रोजी या सर्व तलावांमध्ये १० लाख ३९ हजार ८२५ दशलक्ष लिटर्स एवढा पाणीसाठा जमा झालेला आहे. मात्र, मागील दोन वर्षांच्या तुलनेत अजूनही पाणी साठा कमी असून याच दिवशी मागील वर्षी ८८.१९ टक्के एवढा पाणीसाठा होता, तर २०२१ मध्ये या सर्व तलावांत ७२.२६ टक्के एवढा पाणीसाठा होता.

या सात तलावांपैकी चार तलाव भरले असले तरी मुंबईला ६० टक्क्यांहून अधिक पाणी पुरवठा करणाऱ्या भातसा तलावांमध्ये ६३.७१ टक्के एवढा पाणी साठा जमा झाला आहे. तर चार तलाव भरल्यानंतर एकूण पाणी साठा ७१. ८४ टक्के झाल्याने १ जुलैपासून लागू केलेली दहा टक्के एवढी पाणीकपात मागे घेण्याची मागणी सर्वस्तरातून होत आहे. त्यामुळे सर्व धरणांमध्ये ७० टक्क्यांहून अधिक पाणी साठा जमा झाल्याने पुढील आठवड्यात याबाबतचा आढावा घेऊन पाणीकपात मागे घेण्याचा निर्णय घेतला जावू शकतो,असे महापालिकेच्या अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे.

## जाहीर सुचना

सूचना ह्याद्वारे सर्व जनतेला देण्यात येत आहे की माझ्या अशील श्रीमती आभा चंद्रशेखर शर्मा (आधार क्र. ४०९९ ६३८८ ५१९३) ह्या निवासी सदनिकेचा धारण केलेला सदनिका क्र. ए/ ००२, तळ मजला, रेल विहार कॉ-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लि., प्लॉट क्र. ४, सेक्टर – ४, खारघर, नवी मुंबई, महाराष्ट्र – ४१०२१० च्या पूर्ण वापरकर्त्या, वहिवाटदार, ताबेदार आणि पूर्ण मालक आहेत आणि तसे असण्यासाठी त्या पात्र आणि लायक आहेत.

माझ्या अशिलाने उपरोक नमूद सदनिका क्र. ०२, विक्रीसाठी नोंदणीकृत करार, अनु. क्र. पीव्हीए ५-८७१०-२०२३ दिनांकित २५.०५.२०२३ जे एसआरओ पनवेल ५ ह्यांच्याकडे नोदणी करण्यात आल्यानुसार श्री. सौम्योजित चक्रोबर्ती (आधार क्र. ८२०९ ०७८३ २९७४) विकण्याचे मान्य केले आहे.

कु. आभा चंद्रशेखर शर्मा यांच्या हक्क/ शीर्षक/ हितसंबंधात, मालमत्तेमध्ये, गहाण, बोजा, विक्री, विक्रीचा करार, हस्तांतरण, असाइनमेंट, लीज, भाडेपट्टीवर करार, उप-लीज, विक्री, विक्रीसाठी करार, किंवा धारणाधिकार, शुल्क, विश्वास, देखभाल, आराम, भेट, लिस-पेंडन्स, एक्सचेंज, शेअर, फायदेशीर व्याज, ताबा, सोडणे, सोडणे विभाजन, मुखत्यारपत्र, इच्छापत्र, मृत्युपत्र, वारसा, कौटुंबिक व्यवस्था / सेटलमेंट, ताबा, इ. किंवा मार्गाने किंवा इतर कोणत्याही पद्धतीने किंवा अन्यथा कसेही ("दावे"), याद्वारे अधिवक्ता सी.एम. यांना लेखी कळवणे आवश्यक आहे. शर्मा, फ्लॅट क्र. इथून प्रकाशित झाल्याची तारीख, जर असे मानले जाईल की असे कोणतेही दावे, हक्क, शीर्षक, किंवा हितसंबंध मालमत्ता, किंवा तिच्या कोणत्याही भागासंदर्भात अस्तित्वात नाही आणि ते माफ किंवा सोडून दिलेले मानले जाईल आणि किंवा माझ्या क्लायंटवर. कु. आभा चंद्रशेखर शर्मा ह्यांच्यावर बंधनकारक राहणार नाही.

परिशिष्ट (मालमत्तेचे वर्णन)
सदनिका क्र. ए/ ००२, तळ मजला, रेल विहार कॉ-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लि., प्लॉट क्र. ४, सेक्टर – ४, खारघर, नवी मुंबई, महाराष्ट्र – ४१०२१०

**वकील सी. एम. शर्मा**
**मोबाईल : ९८६९१८३४६०**
दिनांकित : ३१.०७.२०२३

# आंबेनळी घाट वाहतुकीसाठी १५ दिवस बंद

**पोलादपूर, दि. ३० ( वार्ताहर )** : रायगड जिल्ह्यातील अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर पोलादपूर-महाबळेश्वर आंबेनळी घाट रस्त्यावरील दुर्घटना टाळण्यासाठी जिल्हाधिकारी डॉ. योगेश म्हसे यांनी पुढील १५ दिवसांकरिता पोलादपूर-महाबळेश्वर हा आंबेनळी घाटरस्ता सर्व प्रकारच्या वाहतूकीकरिता बंद करण्याची अधिसूचना जारी केली आहे.

अप्पर पोलीस अधीक्षक रायगड-अलिबाग यांच्या पत्रानुसार आंबेनळी घाट रस्ता हा अरूंद व घाट वळणाचा आहे. रस्त्याच्या बाजूला असणारा डोंगरकडा हा या भागात पडणाऱ्या पावसामुळे भूस्खलन होऊन डोंगरावरील माती व मोठमोठे दगड रस्त्यावर येऊ शकतात. तसेच रस्त्याच्या दुसऱ्या बाजूला खोल दरी असल्याने हा घाट रस्ता वाहतुकीस धोकादायक असल्याचे प्रथमदर्शनी दिसत आहे.

कोकण व महाबळेश्वरला जोडणारा पर्यटनाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा असलेला हा आंबेनळी घाट आहे. पर्यायी रस्ता पोलादपूर खेड-चिपळूण-पाटण- कराड-कोल्हापूर तसेच पाटणकडून सातारामार्गे पुण्याकडे असा आहे, असे अभिप्राय सादर केले आहेत. या पार्श्वभूमीवर उपविभागीय दंडाधिकारी महाड डॉ.ज्ञानोबा बाणापुरे यांनी केलेल्या विनंतीनुसार जिल्ह्यातील अतिवृष्टीच्या अनुषंगाने पोलादपूर महाबळेश्वर या आंबेनळी घाटरस्त्यावरील कोणतीही दुर्घटना टाळण्याच्या दृष्टीने जिल्हाधिकारी डॉ.योगेश म्हसे यांनी या अधिसूचना दिनांक २८ जुलैपासून ते पुढील १५ दिवसांकरिता लागू राहतील.

# एएसआय इंडस्ट्रिज लिमिटेड

ASI

**सीआयएन :** L14101MH1945PLC256122
**नोदणीकृत कार्यालय :** मॅराथॉन इनोव्हा, ए विंग, ७ वा मजला, ऑफ गणपतराव कदम मार्ग, लोअर परेल, मुंबई ४०० ०१३.
**दूर.** ०२२-४०८९६१०० **फॅक्स :** ०२२-४०८९६१९९
**वेबसाइट :** www.asigroup.co.in **ईमेल :** investors@asigroup.co.in

## दि. ३० जून, २०२३ रोजी संपलेल्या तिमाही अखेरकरिता अलेखापरिक्षीत वित्तीय निष्कर्षाचा अहवाल

(रु. लाखात)

| अनु. क्र. | विवरण | तिमाही अखेर | | | वर्ष अखेर |
|---|---|---|---|---|---|
| | | ३०.०६.२०२३ (अलेखापरीक्षित) | ३१.०३.२०२३ (लेखापरीक्षित) | ३०.०६.२०२२ (अलेखापरीक्षित) | ३१.०३.२०२३ (लेखापरीक्षित) |
| १. | कार्यचलनातून एकूण उत्पन्न (निव्वळ) | ३५५५.२३ | ४२९०.८१ | ३५४५.६९ | १३७६०.५५ |
| २. | कर पूर्व नफा/(तोटा) | ५५०.३२ | १२२१.३७ | २९४.६० | २४७५.६३ |
| ३. | कर पश्चात नफा/(तोटा) | ४२३.१० | १०४०.०४ | २१२.५६ | १७२७.५१ |
| ४. | कालावधीकरिता एकूण सर्वसमोवशक उत्पन्न (कालावधीकरिता समाविष्ट नफा/ तोटा (करपश्चात) व अन्य सर्वसमावेशक उत्पन्न (कर पश्चात) | ३९४.०९ | १०१४.१३ | २१८.६७ | १६९३.१७ |
| ५. | प्रदानित भाग भांडवल रु. १/- प्रत्येकी | ९००.७५ | ९००.७५ | ९००.७५ | ९००.७५ |
| ६. | अन्य इक्विटी (गत वर्षाच्या ताळेबंदामध्ये निर्देशित मूल्यांकन राखीव वगळता) | - | - | | २१२४९.६३ |
| ७. | उत्पन्न प्रति शेअर रु. १/- प्रत्येकी (वार्षिकरित्या नाही) ए. मूळ | ०.४७ | १.१५ | ०.२४ | १.९२ |
| | बी. सौम्य | ०.४७ | १.१५ | ०.२४ | १.९२ |

टीप :
१. वरील हे सेबी (सूची अनिवार्यता व विमोचन आवश्यकता) विनियमन २०१५ च्या विनियम ३३ अंतर्गत स्टॉक एक्सचेंजेससह दाखल तिमाही अलेखापरीक्षित वित्तीय अहवालाचा विस्तृत प्रारूपांचे सारांश आहे. तिमाही अलेखापरीक्षित वित्तीय अहवालाचा संपूर्ण प्रारूप स्टॉक एक्सचेंज वेबसाइट बीएसई www.bseindia.com व कंपनीची वेबसाइट www.asigroup.co.in वर उपलब्ध आहे.

**मंडळाच्या आदेशान्वये**
**दीपक जाटिया**
**अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक**
**डीआयएन : ०१०६८६८९**

**ठिकाण : मुंबई**
**दि. २९ जुलै, २०२३**